# Sakal India Foundation

Plot No, 27, Narveer Tanajiwadi, Near PMT Depot,
Near Sakhar Sankul, Shivajinagar, Pune 411005,
Maharashtra (India).
Tel. : 020 - 25602100 - Ex. (174) / 66262174
E-mail : sakalindiafoundation@esakal.com
: contactus@sakalindiafoundation.org
Website : www.sakalindiafoundation.com


Sakal
India Foundation
*a medium for social change*
For Excellence in Education
Since 1959

**दिनांक :- १८/०८/२०२५**

**प्रति ,**

**मा.** डॉ. शांतीपाल एस. ओहोळ सर ,

सहयोगी प्राध्यापक,

यांत्रिक अभियांत्रिकी विभाग,

COEP तंत्रज्ञान विद्यापीठ, पुणे.

**विषय :-** सकाळ माध्यम समूहातील 'सकाळ इंडिया फाउंडेशन' अंतर्गत गरजू व गुणवंत विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती उपक्रमाबाबत

मा. महोदय,

सप्रेम नमस्कार,

सकाळ माध्यम समूहातीत 'सकाळ इंडिया फाउंडेशन' या स्वयंसेवी संस्थेची स्थापना प्रामुख्याने गुणवंत व आर्थिकदृष्ट्या कमी उत्पन्न गटातील विद्यार्थ्यांना परदेशात उच्च शिक्षणासाठी व संशोधनाकरीता जाण्यासाठी शिष्यवृत्ती देऊन, प्रोत्सान देणे या मुख्य उद्देशाने करण्यात आली आहे. संस्थेच्या माध्यमातून १९५९ पासून गुणवंत व आर्थिकदृष्ट्या गरजू विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी व संशोधनासाठी बिनव्याजी कर्जाऊ शिष्यवृत्ती दिली जाते. आतापर्यंत उच्च शिक्षणासाठी व संशोधनासाठी परदेशी जाणाऱ्या १,४८० (एक हजार चारशे ऐंशी) विद्यार्थ्यांना ५,६०,९१,०००/- (पाच कोटी साठ ताख ऐक्यानऊ हजार) संस्थेअंतर्गत बिनव्याजीं कर्जाऊ रक्कमेची शिष्यवृत्ती दिली आहे.

संस्थेअंतर्गत दरवर्षी साधारण ५० (पात्र) विद्यार्थ्यांना प्रत्येकी एक लाख रुपयांची बिनव्याजी कर्जाऊ शिष्यवृत्ती दिली जाते. साधारणपणे विद्यार्थ्यांचा दोन ते तीन वर्षाचा अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थी फक्त कर्जाऊ शिष्यवृत्तीची रक्कम संस्थेकडे जमा करतात. अशारितीने जमा केलेली रक्कम नवीन गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती स्वरूपात देण्यात येते.

**'सकाळ इंडिया फाउंडेशन' कडून देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्या :-**

१. करिअर डेव्हल्पमेंट शिष्यवृत्ती

२. बिनव्याजी कर्जाऊ शिष्यवृत्ती

३. शैक्षणिक पालकत्त्व

**१. करिअर डेव्हल्पमेंट शिष्यवृत्ती :-** १९८४ मध्ये 'सकाळ इंडिया फाउंडेशन' संस्थेने गुणवंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी करिअर डेव्हल्पमेंट शिष्यवृत्ती (सीडीएस) योजना सुरु केली. या योजनेअंतर्गत पात्र प्रत्येक विद्यार्थ्यास उच्च शिक्षण पूर्ण होईपर्यंत शिष्यवृत्ती देण्यात येते. या योजनेमागे विद्यार्थ्यांचे शाळा गळतीचे प्रमाण कमी करणे व आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आर्थिक मदत उपलब्ध करून देणे हा उद्देश आहे.

**२. बिनव्याजी कर्जाऊ शिष्यवृती :-** संस्थेच्या माध्यमातून १९५९ पासून गुणवंत व आर्थिकदृष्ट्या गरजू आणि उच्च शिक्षणासाठी व संशोधनासाठी परदेशी जाणाऱ्या विद्यार्थ्यांना संस्थेअंतर्गत शिष्यवृत्ती दिली जाते. या शिष्यवृतीसाठी महाराष्ट्र तसेच संपूर्ण देशातील विद्यार्थी अर्ज करू शकतात. आलेल्या प्रस्तावांमधून संस्थेचे विश्वस्त व तज्ज्ञ समितीतील सदस्यांमार्फत पात्र विद्यार्थ्यांची निवड करण्यात येते.

**३. शैक्षणिक पालकत्व योजना :-** शैक्षणिक पालकत्व योजनेअंतर्गत आर्थिकदृष्ट्या कमी उत्पन्न गटातील गुणवंत व गरजू विद्यार्थ्यांना तसेच स्थलांतरित कुटुंबातील विद्यार्थ्यांना त्यांचे शिक्षण अर्धवट राहू नये म्हणून शिष्यवृती दिती जाते. यामध्ये इयत्ता ५ वी ते ९ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना प्रत्येकी रु १०,०००/- (दहा हजार) रुपयांची मदत केली जाते.

**यंदापासून**...

यावर्षी (२०२५ -२६) अभियांत्रिकीच्या प्रथम वर्षात शिक्षण घेणाऱ्या गरजू व गुणवंत विद्यार्थ्यांना (दोन मुले आणि दोन मुली) प्रत्येकी एक लाख रुपयांची 'सकाळ इंडिया फाउंडेशन' च्या वतीने शिष्यवृत्ती देण्याचे नियोजन आहे. याशिवाय मागील वर्षी प्रथम वर्षाच्या ज्या चार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली आहे, त्या चार विद्यार्थ्यांची प्रथम वर्षाची प्रगती तपासून दुसऱ्या वर्षासाठी निवड करावी. याचबरोबर तृतीय वर्षात शिक्षण घेणाऱ्या गरजू व गुणवंत विद्यार्थ्यांना (दोन मुले आणि दोन मुली) प्रत्येकी एक लाख रुपयांची 'सकाळ इंडिया फाउंडेशन' च्या वतीने शिष्यवृत्ती देण्याचे नियोजन आहे.

याकरीता सीओईपी या शैक्षणिक संस्थेमध्ये अभियांत्रिकीच्या प्रथम वर्षाला शिक्षण घेणाऱ्या चार गरजू व गुणवंत विद्यार्थ्यांची आपण सीओईपी च्या माध्यमातून निवड करून, त्यांचे तपशील आम्हाला कळवावे, ही विनंती. विद्यार्थी हे कमी उत्पन्न गटातील असावेत. तसेच त्यांचे मागील शैक्षणिक वर्षाचे गुण किमान ८५% हुन अधिक असावे. यामध्ये प्रशासन खर्च म्हणून प्रत्येकी ५ हजार रु वजा करून प्रत्येकी ९५ हजार रुपयांची शिष्यवृत्ती मिळेल. किंवा निवडण्यात आलेल्या विद्यार्थ्यांना इतर कोणती शिष्यवृत्ती मिळाली असेल तर त्या (मिळालेल्या शिष्यवृत्तीची) रक्कम वजा करून शिष्यवृत्ती देण्यात येईल.

( कृष्णा वरफडे (द्वितीय वर्ष) संगणक - द्वितीय वर्षासाठी या विद्यार्थ्याचा अर्ज आम्हाला प्राप्त झाला असून, आपल्याकडून निवड करता आली तर पहावे)

**विद्यार्थ्यांचे तपशील खालीलप्रमाणे आवश्यक आहेत.**

विद्यार्थ्यांचे पूर्ण नाव, पूर्ण पत्ता (निवासी व कायमचा), आधार कार्ड, संपर्क क्रमांक व कुटुंबाचा उत्पन्नाचा दाखला आणि सीओईपी संस्थेचे बोनाफाईड किंवा शिफारस पत्र इत्यादी. प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षांसाठी निवडण्यात आलेल्या चार विद्यार्थ्यांना पुढील अनुक्रमे तीन, दोन व एक अशा वर्षांसाठी त्यांची गुणवत्तेच्या निकषांवर शिष्यवृत्तीसाठी निवड करून व त्यासाठी निधी उभारून, शिष्यवृत्ती देण्याचे 'सकाळ इंडिया फाउंडेशन' कडून प्रयत्न केले जातील. शिष्यवृत्ती व शिष्यवृत्तीचे स्वरूप प्रत्येक वर्षी मिळणाऱ्या निधींवर अवलंबुन राहील.

सहकार्याच्या प्रतीक्षेत !

कळावे,

आपला स्नेहांकित ,

महेंद्र पिसाळ

**विश्वस्त**

**सकाळ इंडिया फाउंडेशन**